श्री

बानुटिरेस–ताडदेव,
मुंबई–तारीख २९ जुलै १९२८

श्रीयुत संपादक "**श्री साईलीला**" यास—

सा. न. वि. वि.

मी साईबाबांचा एक भक्त असून आपले मासिक लक्षपूर्वक वाचीत असतों. म्हणून खालील मजकूर आपणास लिहीत आहे त्याचा विचार व्हावा.

संपादक या नात्याने आपला वर्तमानपत्रें वाचण्याचा व्यासंग असेलच व त्यावरून हल्लीं कित्येक दिवस मराठी–इंग्रजी वर्तमानपत्रांतून गाजत असेली गुरुबाजी व श्री उपासनी प्रकरण याची माहिती आपणास नसावी हे संभवत नाहीं. खंडो–उपासनीनें आपली कन्या आपल्या गुरूला (श्री उपासनीला ) अर्पण केल्यापासून, उपासनींच्या लीलांना एक प्रकारचे वैशिष्ट्य येऊन, वर्तमानपत्रांत हल्लीं खळबळ उडाली आहे, परंतु आपल्याला उपासनींच्या लीलाची माहिती फारां दिवसांपासून असली पाहिजे. विशेषेकरून त्यांत श्री साईबाबाचा संबंध येत असतां आपण त्या संबंधानें अजपर्यंत मूग का गिळलेत हे कळत नाहीं आपण श्रीसाईलीला सुरू केलीत, त्यावर उपासनी-पंथाने ' साई वाक्सुधा ' सुरू केली, तरी आपण गप्पच. वाक्सुधा प्रथम मासिक स्वरूपांतच सुरू झाली व नंतर पुस्तकरूपाने बाहेर पडली. श्री उपासनींचे चरित्र प्रसिद्ध झाले, त्यांत श्री साईबाबांच्या भक्तांवर शिंतोडे उडविले तरी आपण गप्पच. आपण श्री साईलीलेत वेळोवेळीं निरनिराळ्या पुस्तकांवर अभिप्राय देऊन मार्मिक टीकाही केली आहे. मग उपासनी–चरित्र आपल्या दृष्टिपथांतून कां चुकले? या आपल्या मुग्ध वृत्तीचा अर्थ, आपलीही उपासनी–पंथाला सहानुभूति आहे असा कोणीं केल्यास ( व त्याप्रमाणे कित्येकजण करीतही आहेत ) हा दोष कोणाचा? वास्तविक आपला श्री उपासनीशीं संबंध जास्त. ते स्वतःला साईबाबांचा एक शिष्य म्हणवितात, साईबाबांच्या नांवावर शिर्डीपासून ३ मैलांवर त्यांनीं आपला मायावी बाजार

उघडला व त्यांत पुष्कळ भोळीं सावजे पकडलीं. आपण जर वेळींच या दंभाचा परिस्फोट केला असता, तर या 'भार्या-कन्या-अर्पण' विधीपर्यंत मजल खास गेली नसती असे मला व माझ्या इतर मित्रांना वाटत आहे. तेव्हां आतां तरी आपण यासंबधीं स्पष्ट खुलासा करावा अशी माझी आपणांस कळकळीची विनंती आहे. कळावे, लोभ असावा ही विनंती.

आपला नम्र

**भगवान दामोदर जोशी.**

*** वर दिलेल्या रा. जोशी याच्या पत्राप्रमाणे आणखींही कांहीं पत्रें आमच्याकडे आलीं आहेत. कांहींनीं उपासनीबुवांचा शिर्डीशीं काय संबंध होता ती माहिती प्रगट करावी अशी मागणी केली आहे. म्हणून आम्हांला आतां या विषयाकडे वळणे भाग पडत आहे.

श्रीसाईलीला मासिक आम्हीं सुरू केले ते महाराजांसंबंधीं वेळोवेळीं त्यांच्या भक्ताना आलेले अनुभव, महाराजांसंबंधी असलेले किंवा तयार होणारें वाङ्मय, व त्या ध्येयाला पोषक असे इतर धार्मिक विषय एके ठिकाणीं संकलित करण्याच्या हेतूने केले. दुसऱ्यावर टीका करणें, कोणाच्या "दंभाचा परिस्फोट" करणे, यापासून अलिप्त राहणेंच आम्हांला श्रेयस्कर वाटलें व अजूनही वाटत आहे. हिंदुस्थानांत, विशेषेंकरून आपल्या महाराष्ट्रांत साधुसंत पुष्कळ आहेत त्यांत जसे खरे सत्पुरुष आहेत, तसे दांभिकही आहेत. त्याची जर आम्हीं छाननी करूं लागलों, तर त्या कार्याला श्रीसाई-लीला अपुरीच पडेल. ईश्वरप्रणित अथवा सृष्टिजन्य वस्तूंत, अग्निसारख्या क्वचित् शुद्ध स्वरूपांत निर्माण झालेल्या वस्तु वगळल्यास सगळीकडे शुद्धा-शुद्धाची मिसळ सांपडेल; व त्यांतून शुद्ध स्वरूप कोणते व अशुद्ध स्वरूप कोणते त्याची पारख करण्याकरितां अवश्य असलेली जी बुद्धि, ती ईश्वराने मानव जातीलाच दिली आहे. पश्वादिकांना ही देणगी मिळाली नाहीं, व म्हणून मनुष्यांत व पशूंत जो मोठा फरक आहे तो हाच आहे. मनुष्यानें जर आपल्या बुद्धीचा उपयोग केला नाहीं, तर त्याच्यांत व पशूंत अंतर न

राहून, त्याच्या हातून साहजिकच पशुतुल्य कृत्ये घडतात. मनुष्याने बुद्धीची कसोटी लावल्यास सत्पुरुष कोण व दांभिक कोण याचा त्याला उलगडा होईल. ती न लावल्यास त्याच्या हातून " कन्या--भार्या-अर्पण-विधि " सारख्या आचरटपणाशिवाय दुसरे काय होणार ?

सत्पुरुषाचीं लक्षणे काय असतात त्याचे वर्णन समर्थ रामदासस्वामी, तुकाराम महाराज वगैरे संतांनीं आपआपल्या ग्रंथांतून केलेले आहे. एकनाथी भागवतांत, एकनाथ महाराजांनीं या विषयावर तर फारच मार्मिक विवेचन केले आहे परंतु अलीकडील " गुरु-बाजी"वर भाळलेली मंडळी हे ग्रंथ पाहतील तेव्हां ते त्यांना कळणार ! हल्लींचा काळच असा आला आहे कीं, एखाद्या धूर्त मनुष्यानें सत्पुरुषाचे सोंग घेतले कीं, त्याला शिष्याला तोटा नाहीं. ही शिष्यमंडळी खरोखरच अंधश्रद्धेने त्याचे चेले बनतात व तो धूर्त सद्गुरु ( ? ) त्यांचा पूर्ण फायदा घेत असतो. अमके एक साधू गांवांत आले आहेत असे कळण्याचा अवकाश, कीं स्त्रीपुरुषाच्या झुंडीच्या झुंडी त्याच्या दर्शनाला धांवतात. हेच उपासनी बुवा एकदां मुंबईत वाळकेश्वरीं आले असताना त्यांच्या दर्शनाला लाखो माणसें येऊन गेलीं असें प्रसिद्ध झाले होते. परंतु यापैकीं क्वचित् कोणी हे खरेंच सत्पुरुष आहेत कीं कोणी दांभिक आहेत याचा विचार केलेला असेल. एक सत्पुरुष गांवांत आले आहेत अशी कर्णोपकर्णी बातमी ऐकली ( ही बातमी बुवांची शिष्यमंडळीच पसरवित असतात ) कीं दर्शनाला झुंडीच्या झुंडी जातात. दर्शनाला येणाऱ्या मंडळींत पारमार्थिक हित करून घेणारा क्वचितच कोणी असतो. मला पुत्र व्हावा, मला द्रव्यप्राप्ती व्हावी, माझे योजिलेले कार्य व्हावे अशा हेतूने आलेलाच बहुजनसमाज असतो बुवा धूर्त असतात व साधारण कल पाहून आशीर्वाद देतात. ज्योतिषाच्या भविष्याप्रमाणे कांहींना दिलेले आशीर्वाद सफल होतात; कांहींचे निष्फल होतात. सफल आशीर्वाद झालेली मंडळी बुवाचे स्तुतिपाठ गाऊं लागतात. निराश झालेली मंडळी आपल्या कर्माला दोष देतात, व सत्पुरुषाची निंदा करण्याला धजत नाहींत. त्याचा परिणाम बुवांना इष्ट असाच होतो. अशा रीतीने बुवाची

एकदां प्रसिद्धि झाली कीं, तो आजन्म सत्पुरुष बनतो. अशा तऱ्हेने बनलेल्या सत्पुरुषांची महाराष्ट्राला तरी वाण नाहीं. उपासनीबुवा हे याच कोटींतील एक सत्पुरुष (?) बनले आहेत, असे त्यांच्याच कृतीवरून अनुमान काढण्यास जागा आहे. उपासनीबुवा कांहीं काल शिर्डीत राहिले होते, याशिवाय त्यांचा शिर्डीशीं कांहीं संबंध नाहीं प्रसंग पाहून, कांहीं वेळां उपासनीबुवा साईबाबाचें शिष्यत्व कबूल करितात व कांहीं वेळां साईबाबा आपले गुरु नव्हेत असेही प्रतिपादन करितात. श्री साईबाबाचें अंतरसाक्षित्व पटलेले भक्त उपासनी बुवांकडे जात नाहींत, मग त्यांच्या भजनीं लागणे तर दूरच राहिले.

रा. जोशी आपल्या पत्रांत लिहितात कीं, उपासनी बुवांच्या दंभाचा आम्हीं वेळींच परिस्फोट केला असता तर भार्या–कन्या–अर्पण विधीपर्यंत मजल गेली नसती. रा. जोशी यांचा हा भ्रम आहे. आज सर्व वर्तमानपत्रांनीं उपासनी बुवांवर हल्ला चढविला आहे, त्यांच्या साई वाक्सुधेतील उतारे देऊन, त्यांतील प्रतिपाद्य विषयांचा तीव्र निषेध केला आहे, भार्या-कन्या–अर्पण विधीवर कडक टीका केली आहे, तरीही रा. जोशी जर साकोरीस जाऊन पाहतील, तर उपासनी नगर पूर्वीप्रमाणेच पूर्ण गजबजलेले त्याना दिसेल. तरुण मुलींचे त्यांच्या आश्रमांतील प्राबल्य, रासक्रीडेप्रमाणे तेथे होत असलेले टिपऱ्याचे खेळ वगैरे तेथील प्रकार त्यांच्या भक्तमंडळींना प्रत्यक्ष पाहण्यास सांपडत असूनही जर त्यांची शिष्यशाखा वाढत चालली होती, तर आमच्या लिहिण्याचा त्यांच्यावर कांहीं परिणाम झाला नसता हें उघड आहे. उलट पक्षीं, जर आम्हीं उपासनी बुवासंबंधीं कांहीं लिहिले असते, तर त्याचा होत असलेला उत्कर्ष आम्हांस सहन होत नाहीं व द्वेषबुद्धीने आम्हीं त्यांच्यावर टीका करतों असा आरोप आमच्यावर आला असता. याच हेतूने आम्हीं त्यांच्या चरित्रावर टीका केली नाहीं. त्यांच्या चरित्रात पुष्कळ गोष्टी अशा आहेत कीं, ज्या वाचून उपासनी बुवाची खरी योग्यता कोणालाही ठरवितां येईल. मासल्याकरितां आम्हीं त्यातील एक उतारा येथे देतो.

" एकदां तर एका गुरुवारीं जानकीबाई नांवाची एक विधवा स्त्री त्यांच्या ( उपासनी बुवांच्या, दर्शनाकरितां पूजासाहित्य घेऊन आली. खोलीच्या बाहेर तिनें आपलें वस्त्र फेडून ठेवून नग्न होऊन ती आंत गेली आणि निर्विकल्प मनानें तिनें महाराजांची पूजा केली. तें पाहून इतर स्त्रियांनीं तिला फार दूषण दिलें. परंतु महाराजांनीं त्याचें निरसनच केलें. इतक्या मंडळींत निर्विकल्प मनानें नग्न होऊन पूजा करणें ह्या भक्ताच्या समुद्राप्रमाणें गंभीर अंतःकरणाचें काय वर्णन करावयाचें ? "

( उपासनी चरित्र, पान २७० )

अशा तऱ्हेचे त्या चरित्रांत किळसवाणे बीभत्स प्रकार बरेच आहेत. एकदा एका चांभाराने आपली बायको महाराजांना अर्पण केल्याचा उल्लेखहा त्या चरित्रांत आहे. हें चरित्र, उपासनी बुवांनी साकोरीस जें 'उपासनी नगर' वसविलें आहे त्याची मुहूर्तमेढ आहे. उपासनी बुवांच्या साधुत्वाचा पाया महाराष्ट्रांत याच चरित्राने घातला. या चरित्राचे गुजराथींत भाषांतर झालेले आहे, व त्यामुळें कित्येक गर्जर व पारशी मंडळीही उपासनी बुवांच्या शिष्य शाखेत मिसळली आहेत. अशा या अमोल ग्रंथाची आजपर्यंत आम्ही उपेक्षा कां केली याचें कारण आम्ही वर दिलें आहे. परंतु ज्या अर्थी, रा. जोशी म्हणतात त्याप्रमाणें आमच्या मुग्धपणामुळे लोकांत गैरसमस उत्पन्न झाला आहे, त्या अर्थी आम्ही पुढील अंकांत या अपूर्व ग्रंथाचे परीक्षण करण्याचे ठरविले आहे.

" साई वाक्सुधा " हा उपासनी बुवांचा, त्यांच्या मुखांतून निघालेला स्वतंत्र ग्रंथ आहे. प्रथम हें मासिक होतें. श्रीसाईलीला बाहेर पडल्यावर, तिला तोडीस तोड म्हणून हें मासिक साकोरीस जन्मास आलें. पुढें मासिक स्वरूप बदलून, ' साई वाक्सुधा ' ग्रंथरूपानें बाहेर पडूं लागली.

साईबाबांचें नांव या पुस्तकाला जोडले आहे, परंतु नांवाशिवाय, त्यांचा या पुस्तकाशीं कोणताही संबंध नाहीं. इतकेंच नव्हे तर वाक्सुधेतील प्रतिपाद्य विषय, श्रीसाईमहाराजांनीं त्यांच्या अनेक भक्तांस वेळोवेळीं निरुपिले गेलेल्या पारमार्थिक तत्वांशीं अगदीं विसंगत आहेत. लोकांची दिशाभूल करून पुस्तकाला ग्राहक मिळावे या उद्देशानें या अमंगल ग्रंथाला 'साईवाक्सुधा' हें नांव दिलेले असावें असे आम्हांस वाटते.

वरील विवेचनानंतर उपासनी-पंथाला आमचीं सहानुभूति असणे शक्य नाहीं हें उघडच दिसून येईल.

—संपादक

## ( १ )

**बापुराव बोरावके**—यांचें मूळ गांव पुण्याजवळील सासवड हें होय.यांचे वडील व मातुःश्री ते लहान असतांना वारले व नातेवाईकांनीं त्यांच्या अज्ञान अवस्थेचा पूर्ण फायदा घेऊन, त्यांची वडिलोपार्जित मिळकत समूळ नाहींशी केली. बापुरावाचें शिक्षण पुण्यास प्रवेशपरीक्षेपर्यंत झाले. वडिलोपार्जित जमीनजुमला नाहीं व शिक्षण पुरें करण्याची सोय नाहीं, तेव्हां तिसरा राजमान्य चरितार्थाचा मार्ग नोकरी व त्याचे अवलंबन करण्याचें त्यांच्या मनांत आले. या सुमारास शिर्डीस पाटाचे पाणी आलें व शिर्डीच्या आसपास बरीचशी ऊंसाची लागवड झाली. बापुरावांचे मामा ऊंसाच्या लागवडीच्या धंद्यांत मुरलेले असल्यामुळे, त्यांनीं शिर्डीजवळ ऊंसाची लागवड केली होती व त्यामुळे त्यांचें वास्तव्य तेथें झाले होतें. त्यांची श्री साईनाथ महाराजांवर निष्ठा जडून, ते महाराजांच भक्त झाले होते. मामामुळे बापुरावांना महाराजांची माहिती झाली व महाराजांच्या दर्शनाला जाण्याची त्याना उत्सुकता झाली. कशी तरी कोपरगांवापर्यंत आगगाडीच्या भाडयाची सोय करून ते पुण्याहून शिर्डीस येण्याकरितां निघाले.त्यांना महाराजांच्या दर्शनाचा इतका ध्यास लागला कीं, नगर जिल्ह्यांत प्रवेश केल्यावर महाराजांचें दर्शन घडण्यापूर्वीं अन्नग्रहण

करावयाचें नाहीं असा त्यांनीं निश्चय केला कोपरगांव स्टेशनवर उतरल्यावर खिशांत तीन आण्याचे पैसे शिल्लक होते, तेवढयावर ते तांग्यांतून गंगातटाका-पर्यंत आले. तेथून पुढे शिर्डी ८ मैल दूर. निष्कांचन असल्यामुळे तांगा किंवा गाडी करण्याची ऐपत नाहीं, म्हणून आठ मैलांचा प्रवास त्यांनीं पायां-नींच केला. शिर्डीच्या थोडे अलीकडे मामांचा ऊंसाचा मळा होता तेथे तिसऱ्या प्रहरीं येऊन पोहोंचले. मामा महाराजांकडे गेले होते. मामी घरांत होत्या. त्यांनीं जेवणाचा आग्रह केला, तेंव्हा महाराजांचे दर्शन झाल्याशिवाय जेवणार नाहीं असे त्यांनीं सांगितले व तसेच उपाशी पोटीं ते निघाले. वाटेंत लेंडी जवळ परत जात असलेले मामा भेटले त्यांनीं केंव्हां आलास, जेवलास काय वगैरे प्रश्न केले. तेंव्हां दर्शन करून जेवायला येतों म्हणून सांगितले. मामांनीं १ रुपया खिशातून काढून त्याना खाऊला म्हणून दिला व तो बापूरावांनीं आपल्या खिशात टाकला. परंतु त्याचे सर्व लक्ष महाराजाकडे लागले असल्यामुळे त्याना त्या रुपयाचे विस्मरण पडले. मशीदींत गेल्यावर महाराजांची प्रशांत मुद्रा पाहून आपल्या श्रमाचे सार्थक झालेसें त्याना वाटले आणि भक्तिभावाने त्यांनीं महाराजाचे चरणावर मस्तक ठेविले, व दर्शन घेतल्यावर हात जोडून ते उभे राहिले. रीतीप्रमाणें महाराजांनीं कुशल प्रश्न विचारल्यावर, त्याच्या जवळ १ रुपया मागितला. मामांनीं दिलेल्या खिशांतल्या रुपयाचें त्यांना पूर्ण विस्मरण झाले असल्यामुळे, आपण निष्कांचन आहोंत हें मनांत येऊन त्यांना फार वाईट वाटले व दीन वाणीने आपल्या जवळ रुपया नाहीं म्हणून त्यांनीं महाराजांना सांगितलें. बापुरावांना खिशांतील रुपयाचे विस्मरण झाले होते तरी महाराजांना तो पूर्ण ज्ञात होता. ते बापुरावांना म्हणाले, "खिशात असेल बघ,फकिराला रुपया द्यावा लागतो." खिशांत रुपया नाहीं हा बापुरावांचा समज, तेंव्हा असणार कोठून? परंतु महाराज खिशांत बघ म्हणाले म्हणून त्यांनीं खिशात हात घातला तों रुपया हाताला लागला. लगेच त्यांना मामानीं दिलेला रुपया आपण घाईघाईने खिशांत टाकला त्याची आठवण झाली व आपण विसरलों होतों, परतु महा-राजांना तो माहीत होता, या महाराजांच्या लीलेचे त्यांना आश्चर्य वाटलें व

महाराजांवरील त्यांची निष्ठा दृढ झाली. तूर्त नोकरी पहाण्याचा विचार रहित करून,कांहीं दिवस महाराजांच सेवेंत घालवावे असें वाटून ते आपल्या मामाच्या मळ्यांत राहूं लागले. महाराजांच दर्शन घ्यावे व मामाच्या मळ्यांत काम करावें हा बापुरावांचा नित्य क्रम बनला. या प्रमाणे कांहीं काल लोटल्यावर, एक दिवस मामांचे एक स्नेही त्यांच्या मळ्यावर आले. त्यांनींही कोपरगाव स्टेशनजवळ बरीचशी ऊसाची लागवड केली होती. मामांच्या मळ्याचे बदललेले स्वरूप पाहून त्याना आश्चर्य वाटले व हें काम कोणाचे असे विचारतां मामांनीं आपल्या भाच्याकडे बोट दाखविले. हे पाहुणे बापुरावावर इतके खूष झाले कीं, त्यांनीं आपण त्यांना आपल्या मळ्यांत सर्कतींत घेतों म्हणून इच्छा प्रगट केली, व मामांनीं ती गोष्ट कबूल केली. बापुराव दोन्हीं मळ्यांत काम पाहूं लागले. गूळ चांगला निघूं लागला. भावही चांगला येऊन पंचवीस हजार, पसतीस हजार, पन्नास हजार अशा मोठ्या प्रमाणावर नफा होऊं लागला. दोन वर्षांनीं हिशोब झाला, त्यांत बापुरावांना त्यांच्या हिश्शाचे एक लाख रुपये मिळाले. बागाईतीचा त्यांना नाद असल्यामुळें, ज्या महात्म्याच्या आशीर्वादाने आपणास ही स्थिति आली, त्याच्या स्मरणार्थ बापुरावांनीं शिर्डीपासून १ मैलावर सडके लगत एक मोठा बाग लावला आहे व त्यांत सत्री, मुसंबी, चिकू, आंबा यांची लागवड केली आहे. सडकेवरून जाणाऱ्यायेणाऱ्या प्रत्येक इसमाचे या बागेकडे लक्ष वेधून तो त्याच्या संबंधीं प्रशंसापर उद्गार काढल्याशिवाय राहत नाहीं. गुरुस्थानाचे सान्निध्य मिळावे म्हणून बापुरावाचा तेथे एक घर बांधून कायमचे राहाण्याचा विचार झाला आहे. गुरुपदीं अढळ निष्ठा असल्यामुळे ते वरचेवर शिर्डीस येतात व प्रत्येक उत्सवाला सहकुटुंब हजर असतात.

॥ स्फुट ॥ ॥ श्रीदत्त चिदीश साईजनन्यैनमः ॥

सप्रेम साष्टांग नमस्कार वि. वि. खालील मजकुरास व अनुभवास आपल्या विबुधमान्य श्री साईलीलेच्या एखादे अंकीं स्थळ द्यावे अशी सविनय प्रार्थना आहे.

स्रग्धरावृत्तम् ।

साक्षान्नारायणो यः कलिमल दहनो भक्तचित्ताभिरामः ।
यस्यानंदावतारोऽ भवदव नितले शीरडी दिव्य भूमौ ।
आविष्कर्तुं परांतां सगुणवपुषि या निर्गुणैश्वर्य सत्ता ।
तस्मै श्रीशाय नित्यं त्रिभुवन गुरवे साइने मे प्रणामः ।

**अर्थः**—जो प्रत्यक्ष भगवान् परमात्मा, कलियुगातील पातकांना जाळून गारा, भक्तांच्या चित्ताला रंज[illegible]रा, निर्गुण परब्रह्माच्या ठिकाणीं जे परम [illegible] आहे व जी परमश्रेष्ठ सत्ता आहे ( कर्तुं अकर्तुं अन्यथा कर्तुं ) तीच व तेच ऐश्वर्य ( त्यानीच धारण केलेल्या ) सगुण मानव शरीरांतही आहे शविण्याकरितां ज्याचा आनंददायक अवतार शिरडी गांवच्या दिव्य भूमींत । त्या त्रैलोक्यगुरु श्रीश साई राजाला माझा अखंड नमस्कार असो.

श्री साईलीलेच्या तृतीय वर्षाच्या नवमांकीं बाबांच्या चरित्र रत्नाकरासंबंज्या ७७ बाबींचें जे एक छोटेसे टिपण केले आहे, त्यापैकीं बाबांनीं गोदावरी तटाकीं का निवास केला या प्रथम बाबीच्या व बाबा हिंदु [illegible] ऊमान या २८ व्या बाबीचें मागील दोन अंकात यथामति विवेचन केले. [illegible]ां बाबा व बाबांची उदी या २३ व्या बाबीचे या अंकांत विवेचन करचे योजिलें आहे.

अनुष्टुप्वृत्तम् ।

पवित्रा, मंगला, पुण्या, । किंचित्कृष्णा सिता शुचिः ।
संजाता या शुभा रक्षा । मशीदिज्वलिता नलात् ॥ १ ॥

गुरुणा साइनाथेन। स्वकरेण यथा मुदा।
चर्चितं विनतं भालं। भक्तानां स्वपदेऽमले ॥ २ ॥

आगतानां तु सर्वेषां। मशिद्यां दर्शनाय च।
सा प्रोक्ता साईदेवेन। उदीरिति कपर्दिना ॥ ३ ॥
उत्कार उच्यते चोर्ध्वं। इकारो गमनं स्मतः।
ईकरापि तथा ख्यातः। गगनं चोद्गमो बुधैः ॥ ४ ॥
उदयं करोति भाग्यस्य। भक्तानां साइसद्गुरोः।
इहलोके परमेच। सोदिवोदीति कीर्तिता ॥ ५ ॥

श्रीरुदी भक्तजननी। भक्त चिंतामणि स्तथा।
मंदारःकामधुक् दिव्या। भक्तकल्याणकारिणी ॥ ६ ॥
~~चिंता क्लेश हरा शुद्धा। भीतिसंकटनाशिनी।~~
यशोदा धनदा धन्या। दोषसंहारिणी तथा ॥ ७ ॥
दुःखघ्नी सुखदानित्यं। नातिक्ता ना विदाहिनी।
कट्वम्ललवणा नास्ति। सेवने मधुरा प्रिया ॥ ८ ॥
साक्षाद्दिव्यौषधिश्चात्र। जाढ्य रोगाध संहरा।
कृपया साइ नाथस्य। निर्मिताभक्त शर्मणे ॥ ९ ॥
तत्सेवनं चानु दिनं। श्रद्धाभक्ति समन्वितम्।
मोक्षदायि भवेत्सत्यं। विद्यते नात्र संशयः ॥ १० ॥

**अर्थः**—मशीदींतील पेटलेल्या अग्नीपासून जी पवित्र, मंगल, पुण्य, पांढरी पण थाडी काळसर व शुभरक्षा ( राख ) तयार झालेली (असे ), व मशीदींत आपल्या दर्शनाकरितां आलेल्या व जे आपल्या पवित्र पायांवर ठेवून वंदन करीत, त्या सर्व भक्तांच्या कपाळीं श्रीसद्गुरु साईनाथ आपल्या हाताने प्रेमाने लावीत, त्याच रक्षेला शंकररूप बाबा उदी असे म्हणत

" द्वितीयाद्वयं " ही असे वेदवाणी । मिथ्या तीते कोणी म्हणूं नये ॥१५८॥
मी-तूं-पण ज्याच्या मनीचे सरेना । "तत्त्व" हे जिरेना तया पोटीं ॥ १५९ ॥
धर्मग्रंथीं हेतु अहंभाव जावा । किंवा कमी व्हावा ऐसा असे ॥ १६० ॥
वेदीं रामायणीं पुराणीं भारतीं , आदि-मध्य-अंतीं गाती हरि ॥ १६१ ॥
गजेंद्रमोक्षांत व्यासवाणी ऐशी । हरीचीहि तैशी गीतेमाजी ॥ १६२ ॥
सर्वभूताधार असे एक हरि । त्यावीण तीं सारीं निराधार ॥ १६३ ॥
एतदर्थ मिथ्या होती "सः त्वं अहं" । सत्यत्व ते "सोऽहं" माजी असे॥१६४॥
हें कळाया भिन्न अधिकारीयासी । भिन्नची मार्गासी योजी वेद ॥ १६५ ॥
" सर्व मिदं ब्रह्म" ऐसा भाव नोहे । तया सांगे पाहे द्वैतभक्ति ॥१६६॥
एका जगदीशीं भावना न राहे । त्यांना भक्ति आहे देवतांची ॥१६७॥
किंवा तीर्थयात्रा वा ती मूर्तिपूजा । देव काहीं दुजा नाहीं कोठे ॥१६८॥
नवविधा भक्ति अथवा ते ध्यान । कोठे तरी मन स्थिर व्हावें ॥ १६९ ॥
कैशातरी योगे ममता देहाची । कमी व्हावी हाचि मुख्य हेतु ॥ १७० ॥
देव तो दिसेना देउळ प्रत्यक्ष । बहुतांचें लक्ष देउळीच ॥ १७१ ॥
त्यामुळें सत्कर्म ना ती सत्यभक्ति । विषयीं आसक्ती वाढे बहु ॥ १७२॥
विषयासक्तीने बोळवणी ज्ञान । होते हे अज्ञाना न कळेचि ॥ १७३ ॥
त्रिविध प्रारब्ध तयाच्या बलानें । विषय भोगणें तें निर्दोष ॥ १७४ ॥
इंद्रिये धावती विषयांच्या मार्गें । तयाते विरागे आवरावें ॥ १७५ ॥
पंच विषयाचे दोष नुमजता । जीव हा सर्वथा मोहीं पडे ॥१७६ ॥
विचारें ते दोष जाणे जो सभाग्य । तयासी वैराग्य लाभतसे ॥१७७ ॥
ज्ञानेश्वरीमाजीं अहिंसा जी सांग । वर्णिली ती अंग वैराग्याचें ॥१७८ ॥
अहिंसा साधावी प्रथम कायिक । नंतर वाचिक मानसिक ॥ १७९ ॥
देवापायीं काया वाचा आणि मन । करावें अर्पण वैराग्यार्थ ॥ १८० ॥
कामक्रोध येतां आवरावी काया । विवेक न वाया दवडावा ॥ १८१ ॥

काया वाचा मन लावावीं सत्कर्मीं । विषयांची ऊर्मी दाबूनियां ॥१८२ ॥
सत्यहित प्रिय ऐसेचि बोलावे । अथवा घालावे मूग मुखीं ॥ १८३ ॥
वाचासिद्धि व्हाया लागे शुद्ध सत्य । तेचि सदा पथ्य आवश्यक ॥ १८४ ॥
जया भाषणाने बहु उपकार । ते होय साकार पुण्यरूप ॥ १८५ ॥
अवश्य जं नाहीं दोषाविष्करण । त्याच्या त्यागाविण पुण्य नोहे ॥ १८६ ॥
निंदा ना तें स्तुति सत्याचे मंडन । असत्य खंडन यथोचित ॥ १८७ ॥
निंदा—स्तुति वर्ज करोनियां वाणी । लावावी ती क्षणीं भजनींच ॥ १८८ ॥
वसे ज्याच्या मनीं शांति क्षमा दया । वस्ती देवराया तेथें करी ॥ १८९ ॥
सात्विका सरक्षी दुष्टांते संहारी । त्याते म्हणे हरी दयाव्रत ॥ १९० ॥
पश्चात्तापे कोणी आलिया शरण । क्षमा त्याते जाण योग्य असे ॥ १९१ ॥
नाहीं तरी शिक्षा दुष्टासी करावी । क्षमा आवरावी ऐशा वेळीं ॥ १९२ ॥
कैवार तो घ्यावा दुर्बळांचा सदा । धैर्य तेथे कदा सोडूं नये ॥ १९३ ॥
परि दुर्बळाने क्षमेची काहाणी । वदोनी न वाणी विटंबावी ॥ १९४ ॥
मनामध्ये शाति असो द्यावी सदा । कशीहि आपदा आली तरी ॥ १९५ ॥
खेद केलियाने लाभ होत नाहीं । दुःखचि ते पाही दुणावते ॥ १९६ ॥
दुःख निवारणीं ठेवावी दक्षता । परि शांति जातां कामा नये १९७ ॥
**कर्तृत्व कारण कार्य हीं सर्वथा । प्रकृति घे माथा आपुलिया ॥१९८॥**
प्रकृति ईशाची आत्म्याने निजागें । भ्रष्टावे तीसंगे कशासाठीं ॥ १९९ ॥
प्रारब्ध **कारण** देहप्राप्ति **कार्य** । तीसंगे अनार्य होऊं नये ॥ २०० ॥
इंद्रियें विषय देह मन प्राण । विवेक सुजाण दैवें प्राप्त ॥ २०१ ॥
देवाची एवढी देणगी ती व्यर्थ । दवडूनि स्वार्थ कां त्यागावा ॥ २०२ ॥
कर्तव्य करूनी स्वस्थचि राहतां । आत्मलाभ हाता येत जातो ॥ २०३ ॥
अभिमान जाय शांतिहि जोरावे । आनंद थोरावे मनामाजी ॥ २०४ ॥
प्रारब्धाचें कार्य प्राप्तदेह होय । तयाते उपाय नच काहीं ॥ २०५ ॥

संचित क्रियमाण हीं होती कारण । पुनर्जन्मा जाण निश्चयेसी ॥ २०६ ॥
कार्य अनावर जाणूनि कारणा । आवरी तो राणा महाशूर ॥ २०७ ॥
विषयीं विरक्ति हेचि आवरण । कारणासी जाण विनाशक ॥ ५०८ ॥
गीतेच्या तिसऱ्या अध्यायातीं हरि । हाची बोध करी अर्जुनातें ॥ २०९ ॥
तथापि विरक्ति नोहे ज्ञानाविना । ह्यास्तवचि ज्ञाना आद्यपद ॥ २१० ॥
ज्ञान वैराग्याची संपदा जयाला । लाभली तयाला न संचित ॥ २११ ॥
तैसे क्रियमाण तेहि क्षया जाय । पूर्णत्वे तो होय बंधमुक्त ॥ २१२ ॥
देवाचिया पायीं काया वाचा मन । समर्पिल्या कोण नोहे मुक्त ॥ ५१३ ॥
साईकृपे मना हेचि व्रत पाळी । पापपुण्यें जाळी रामय्याचीं ॥२१४ ॥

## सिद्धावस्था.

(अभंग)

ब्रह्मज्ञानियासी वासनेचा संग । नोहे सदा दंग आत्मानंदीं ॥ १ ॥
अहंभाव त्याचा ब्रह्मींच जिराला । त्यासवेचि गेला दुःखसंग ॥ २ ॥
निरकुशा तृप्ति भोगीतसे नित्य । प्रपंच अनित्य उमजोनी ॥ ६ ॥
ज्ञानप्राप्तिद्वारे झाला मनोनाश । उपाधींत क्लेश तया नाहीं ॥४ ॥
"न मिळो खावया न वाढो संतान" । ऐशी वाणी ज्ञान कोण वदे ॥ ५ ॥
देहत्रयाभिन्न ज्ञानयोगी सदा । प्रारब्ध मर्यादा ओळखूनी ॥ ६ ॥
उपाधींत भासे परि तेथे नाहीं । आपुलिया ठायीं नित्यानंदी ॥ ७ ॥
प्रवृत्ति निवृत्ति कांहीं तया नोहे । निर्द्वंद्व तो होये म्हणुनिया ॥ ८ ॥
विधिनिषेध ह्या द्वंद्वाची ती काहीं । आडकाठी नाहीं द्वंद्वातीता ॥ ९ ॥
प्रारब्धेंचि प्राप्त तया जें जें कर्म । तें प्रकृतिधर्म समजे तो ॥ १० ॥
मायोद्भूत होय जीवांची अविद्या । विद्या गुणा आद्या ओळखी तो ॥ ११ ॥
सर्व कर्मारंभ अविद्येपासाव । कर्मारंभा ठाव नसे त्याणे ॥ १२ ॥

"सर्वं कर्माखिलं ज्ञानेसमाप्यते । ऐसे" हे वदते कृष्णवाणी ॥ १४ ॥
यज्ञभोक्ता हरि यज्ञार्थ ते कर्म । इतर विकर्म वदे हरि ॥ १५ ॥
चित्तशुद्धि व्हायासाठीं धर्म्यकर्म । ऐसें सांगे वर्म स्वये कृष्ण ॥ १६ ॥
त्रिविध प्रारब्धें निपजे जें कर्म । तयासी स्वधर्म म्हणे देव ॥ १७ ॥
त्यागबुद्धि तेथे धरिल्या अधर्म । अकर्मीं विकर्म तिच्यायोगें ॥ १८ ॥
ऐशीं कर्मतत्वें ज्ञानी जाणे सारीं । तया कोण्यापरी द्वंद्व बाधे ॥ १९ ॥
सबाह्याभ्यंतरीं भरे हरि जेथें । आपपर तेथे कैसें वसे ॥ २० ॥
**परा ज्ञाननिष्ठा** सन्यासेचि प्राप्त । ऐशी वाणी आप्त हरि वदे ॥ २१ ॥
एवं ज्ञानियासी सहज संन्यास । पूर्व योगाभ्यास उपेक्ष्य त्या ॥ २२ ॥
जैसे जैसे कार्य येई ज्या ज्या वेळीं । सामग्री त्या काळीं तत्सिद्धीची ॥२३॥
रावणाच्या वधा रामाचें ऐश्वर्य । त्याचे काय कार्य इतरत्र ॥ २४ ॥
"जगाच्या कल्याणा संताच्या विभूति" । प्राप्त कार्यीं देती निज दृष्टि ॥२५॥
कोण्या कार्यी तया "**अहंभाव**" नसे । त्यासवे जातसे "**त्वं**" हा भाव ॥२६॥
त्याच्या देहत्रया ईश योजी जैसे । प्रवृत्त ते तैसे ईशेच्छेने ॥ २७ ॥
निमित्त अर्जुना करूनि श्रीहरि । दुष्टातें संहारी तैसेचि ते ॥ २८ ॥
अज्ञानी वर्तती सदा अहंभावे । संत अनहंभावें हें तात्पर्य ॥ २९ ॥
अविद्यानाशानें सर्वकर्मातीत । होऊनी वर्तत ज्ञानी जगीं ॥ ३० ॥
अतिवर्णाश्रमीं तयां धर्माधर्म । आणि कर्माकर्म नसे कांहीं ॥ ३१ ॥
परमहस हे नाम साजे तया । इतरा तें वाया दंभार्थचि ॥ ३२ ॥
ब्रह्मभावें हेचि होय त्याचे कर्म । घ्यावा आत्मधर्म मुमुक्षूंना ॥३३ ॥
" स्व "म्हणजे आत्मा तत्प्राप्त्यर्थ कर्म । तो होय स्वधर्म ज्ञानियांचा ॥३४॥
ह्याचि धर्मे रत सर्वभूतहितीं । सदा ते राहती निर्वैरत्वे ॥ ३५ ॥
मूळ अज्ञानाचा करावया नाश । धरितांती पाश स्वहस्तीं ते ॥ ३६ ॥
तेहि घडे जेव्हां सोडिती समाधि । घेऊनि उपाधि दीनासाठीं ॥ ३७ ॥

मायानाशाविणें नेणे अन्य पंथ । माझा साईनाथ ऐसा असे ॥ ३८ ॥

त्याची जी आत्मजा कृपा तिची माळा । पडो माझ्या गळां लवलाहीं ॥ ३९ ॥

साईचें अनन्य चिंतन ह्या काजा । योगक्षेम माझा मी न इच्छी ॥ ४० ॥

साई तुझ्या पायावीण आतां कांहीं । रामय्याला नाहीं ठाव कोठें ॥ ४१ ॥

## ब्रह्मात्म्यैक्य

( अभंग )

सत्पद साजतें अनाद्यनंतत्वीं । ब्रह्मत्वीं आत्मत्वीं कळों येते ॥ १ ॥

सर्व सृष्ट भूते तेथोनिया येती । विलया तीं जातीं पुनः तेथे ॥ २ ॥

त्यासी ना रूप ना तें कांहीं नाम । वेद म्हणे "ब्रह्म" बोधास्तव ॥ ३ ॥

सत्ता ज्ञान सुख ह्यांचीं तेथें वस्ती । आहे परि उक्ति ही मायिक ॥ ४ ॥

तेथें वर्णा कोण नाम रूप गुण । अद्वैत तें पूर्ण स्वतःसिद्ध ॥ ५ ॥

जडाजडां सर्वां तेथे एकात्मता । अभेद तत्त्वतः परिपूर्ण ॥ ६ ॥

ईश माया देव आणि सारे जीव । विश्वासीं संभव तेथोनियां ॥ ७ ॥

कार्य ना तो कर्ता स्रष्टा ना तो हर्ता । कशाचीहि वार्ता तेथे नाहीं ॥ ८ ॥

सर्व परिच्छेदा होतो तेथें अंत । अनादि अनंत अखंड तें ॥ ९ ॥

अनिर्वचनीय सारे एकाकार । तया पारावार मुळीं नसे ॥ १० ॥

अनंत काळींच्या अनंत त्या सृष्टि । सर्वांची समष्टि तेथें होते ॥ ११ ॥

ईश्वर जो मायी त्याचेंहि ते मूळ । तया गोत्र कूळ कांहीं नाहीं ॥१२ ॥

शाखाचंद्रन्याये बुद्धीस जे कळे । तेणेंचि आकळे ती सद्वस्तु ॥ १३ ॥

बीजासम फळें ह्या न्यायें पाहतां । जडीं भासे सत्ता ती ब्रह्माची ॥ १४ ॥

परि जडीं कदा नसे सुख ज्ञान । पूर्णत्वे अज्ञान तेथें वसे ॥ १५ ॥

जीवां मायोपाधि त्यातें सत्ता ज्ञान । न आनंदघन कोणी जीव ॥ १६ ॥

स्थितप्रज्ञाठायीं सत्ता ज्ञान सुख । तीं सर्व अशेख ब्रह्माचींच ॥ १७ ॥
महावाक्यांद्वारें ब्रह्मात्मैक्य कळे । तेणेचि आकळे जीवेशैक्य ॥ १८ ॥
ब्रह्म आणि आत्मा दोन्ही कर्मातीत । स्थितप्रज्ञ होत तैसाचि तो ॥ १९ ॥
सर्व कर्मारंभ परित्यागावीण । गुणातीत कोण होऊं शके ॥ २० ॥
तैसाचि त्यावीण भक्तश्रेष्ठ नोहे । गीता वदताहे हेंचि तत्त्व ॥ २१ ॥
ब्रह्मात्मैक्य ज्ञान ब्राह्मणांचा धर्म । ज्यां शमादि कर्म स्वभावज ॥ २२ ॥
अन्य वर्णां साध्य योग ईश्वराचा । राजर्षींना ज्याचा लाभ झाला ॥ २३ ॥
भीष्मस्तवराज केल्या विलोकन । कृष्णात्म्यैक्याद्भिन्न भीष्म नोहे ॥ २४ ॥
प्रथम ती भक्ति भक्तीने वैराग्य । वैराग्ये सभाग्य आत्मरती ॥ २५ ॥
आत्मरति नोहे ब्रह्मज्ञानावीण । जीवेशाचे पूर्ण ऐक्य तेथे ॥ २६ ॥
जीवांची अविद्या ईश्वराची माया । गेलिया विलया उरे ब्रह्म ॥ २७ ॥
ऐशिया प्रकारे सत्ता ज्ञान सुख । स्थितधी निःशेख भोगिताती ॥ २८ ॥
आर्द्रता व गोडी तैसा शुभ्रवर्ण । नामरूप गुण एका दुग्धीं ॥ २९ ॥
तैशीं ब्रह्मीं सत्ता ज्ञान सुख तिन्ही । राहति मिळूनी अद्वैतत्वे ॥ ३० ॥
ह्या तिहींचा भोक्ता तोचि स्थितप्रज्ञ । अल्पज्ञ वा अज्ञ तदितर ॥ ३१ ॥
ब्रह्मामाजीं नाहीं मुळीं जडभाव । तैसा त्या न ठाव स्थितधींत ॥ ३२ ॥
सच्चिदानंदाचा असे स्वानुभवी । त्यामाजीं पहावी तद्ब्रह्मता ॥ ३३ ॥
सच्चिदानंदत्व आत्मीं ब्रह्मीं सम । भावना विषम न अद्वैतीं ॥ ३४ ॥
स्वरूप जाणोनी योगी भोगी त्यातें । स्पर्शी न तयातें माया कदा ॥३५॥
येथें व्हावी जहदजहल्लक्षणा । नाहीं तिच्याविना बोध होत ॥ ३६ ॥
ब्रह्म तेंचि आत्मा ऐसे वदे श्रुति । दावूनी प्रतीति बुद्धिद्वारें ॥ ३७ ॥
"प्रज्ञानं ब्रह्म" ह्या ऋग्महावाक्याची । योजना वेदींची आत्मीं ब्रह्मीं ॥३८॥
"अहं ब्रह्मास्मि" ह्या वाक्याची प्रत्यक्ष । देतसे जो साक्ष तो सद्गुरु ॥ ३९ ॥
" तत्वमसि " ह्याच्या उपदेशालागीं । सच्छिष्य निजांगीं पात्र होय ॥४०॥

"अहं"-"त्वं" ह्यांमाजी वसतें जे सम । "**अयमात्माब्रह्म**" तेचि दावी॥४१॥
शास्त्रज्ञान आद्य उमजावें खरे । पूर्ण बोध उरे पुढेंचि तो ॥४२ ॥
पूर्ण बोध वसे गुरुकृपेमाजी । **शब्दज्ञान कांजी न अमृत** ॥ ४३ ॥
जगीं तो थोरला देव चोरिलासे । गुरुवीण दिसे ना जो कदा ॥ ४४ ॥
समर्थांची ऐशी प्रसिद्धचि उक्ति । कोण गुरुभक्तिवीण तरे ॥ ४५ ॥
पूर्ण बोधासाठीं साईंच्या चरणीं । राहे निशिदिनीं रामय्या हा ॥ ४६ ॥

## ॥—ॐ नमो भगवते श्रीसाइनाथाय ॥

( सौख्यसाधनविचार – अभग )

नारदे वर्णिले महात्म्य भक्तीचे । गावे तेचि साचे गीतान्वये ॥ १ ॥
साईने अनुज्ञा दिली ऐशा कार्यी । परंतु तत्पूर्वी योजी अन्यीं ॥ २ ॥
योग तो हरीशीं ज्ञान ते आत्म्याचे । बळ संन्यासाचे इष्ट दोघा ॥ ३ ॥
सूत्रा उपाद्घात ऐसा हा करावा । मग हातीं घ्यावा तो सूत्रार्थ ॥ ४ ॥
ऐशीच प्रेरणा करीतसे साई । तदर्थचि देई पूर्वकार्य ॥ ५ ॥
ते करूं प्रथम मग सूत्रें गाऊं । तयां नाम देऊं सद्गुरूचे ॥ ६ ॥
भक्तिज्ञानेतर अप्राप्तीं आसक्ति । तीच कामासक्ति मूर्तिमंत ॥ ७ ॥
आत्मस्वरूपाचें सत्य ज्ञान व्हावे । ऐशी इच्छा नोहे काममय ॥ ८ ॥
केवल भौतिक ज्या वासना होती । त्यांमाजींच वस्ती करी काम ॥ ९ ॥
नीच योनिधर्म काम असे खरा । नरा नाहीं बरा तो कदापि ॥ १० ॥
जीवा श्रेष्ठपदीं जाण्याचा उपाय । नरदेहीं होय उपलब्ध ॥ ११ ॥
आपणा अतीष्ट तें इतरा देई । समई त्या ठायीं वसे पूर्ण ॥ १२ ॥
करूनि स्वोद्धार इतरां उद्धरी । उदार त्या हरि म्हणतसे ॥ १३ ॥
भक्त किंवा ज्ञानी ह्यांवीण महात्मा । न म्हणे विश्वात्मा कोणासीच ॥ १४ ॥
जैमिनी व्यासांचा शिष्य तोहि ज्ञानी । मीमांसा वदोनी वर्णी स्वर्ग ॥ १५ ॥

ऐहिकापरीस पारत्रिक बरा । काम , ऐसा खरा त्याचा हेतु ॥ १६ ॥
शिष्टाचारावरी ठेवूनिया लक्ष । करी पूर्वपक्ष श्रीजैमिनी ॥ १७ ॥
ऐहिक वासना सोडवायास्तव । स्वर्गाचा गौरव तेणे केला ॥१८॥
गुरु व्यास करी उत्तरपक्षातें । वर्णी वेदांतातें मोक्षार्थचि ॥ १९ ॥
स्वर्गपर कर्मै स्तवीत जैमिनी । श्री व्यास वाखाणी संन्यासाते ॥ २० ॥
स्वर्गपर कर्मैं तीं सारीं सकाम । मोक्षार्थ निष्काम आवश्यक ॥२१॥
निष्काम जीं कर्मैं तीं होती **स्वभावें** । "अहं मम " भावे न होतीं तीं ॥२२॥
**स्वभावज** कर्मैं प्रारब्धाचा क्षय । भोगाअंतीं होय हा शास्त्रार्थ ॥ २३ ॥
सकाम कर्माचें फळ असे व्यक्त । सर्वस्वी अव्यक्त निष्कामाचे ॥ २४ ॥
आद्यंतीं अव्यक्त मध्येंचि जें व्यक्त । मुमुक्षु आसक्त न त्या ठायीं ॥ २५ ॥
अव्यक्तोऽक्षराची प्राप्ति ज्याचें **कार्य** । **त्या कारणा** धैर्य लागे फार ॥ २६॥
"नायमात्मा बलहीनेन लभ्यः " ही । श्रुति वदे पाही ऐसा अर्थ ॥ २७ ॥
तुकाराम वदे चणे लोखंडाचे । खावे तेव्हा नाचे जीव ब्रह्मीं ॥ २८ ॥
दृढ वैराग्येंचि मिळे अधिकार । मोक्षमार्गावर आरूढण्या ॥ २९ ॥
मोक्षमार्गनिष्ठा ती असे द्विविध । प्रपंचाचा बाध आद्य तींत ॥ ३० ॥
शमादि कर्मांनीं लाभे ज्ञानमार्ग । अन्यीं भक्तिमार्ग योगनामा ॥ ३१ ॥
फलत्वे तीं एक, ज्ञानाने निर्गुण । भक्तीने सगुण ब्रह्मप्राप्ति ॥ ३२ ॥
विवेकें ब्राह्मण भक्तीनें इतर । ब्रह्मपदावर आरूढती ॥ ३३ ॥
विवेकीं सामर्थ्य देत असे भक्ति । पूर्ण ईशासक्ति झाल्यावरी ॥ ३४ ॥
ऐशी चित्तशुद्धि करीतसे भक्ति । मग ईशप्राप्ति होय ज्ञानें ॥ ३५ ॥
ब्रह्मात्मैक्य सांख्यां ईशात्मैक्य योग्यां । इतर अभाग्यां जन्ममृत्यु ॥ ३६ ॥
स्वसाध्यीं अनन्य व्हावें लागे दोघा । सर्व कर्मैं मागा टाकोनियां ॥ ३७ ॥
अनंत जीवांत एकादाचि धीर । मारी महावीर कामनामा ॥ ३८ ॥
भक्ति-ज्ञान-निष्ठा नाहीं ती फुकाची । साधनें तियेचीं वदूं आतां ॥ ३९ ॥

अनंत जन्मींचीं सत्कर्में फळतीं । शुद्ध पराभक्ति तेव्हां लाभे ॥ ४० ॥
अनुस्मृतीमध्यें ह्या अर्थाची उक्ति । असे ती पुढतीं दावूं आद्य ॥४१ ॥

### श्लोक

**जन्मांतर सहस्रेषु तपोध्यानसमाधिभिः ।**
**नराणां क्षीणपापानां कृष्णे भक्तिः प्रजायते ॥**

इहपरलोकीं केलेलीं सुकर्में । सारीं निजधर्में फळती जैं ॥ ४२ ॥
तैं सर्व कर्मां येते निर्माल्यता । भक्तीच तत्त्वतां उरे पुढे ॥ ४३
सर्व धर्मकर्में निःशेषचि होती । तेव्हां हरिभक्ति लाभतसे ॥ ४४ ॥
एका हरिवीण कांहींचि स्फुरेना । तेव्हा कर्मा दीनां कोण स्मरे ॥ ४५ ॥
सबाह्याभ्यंतरीं निर्धर्म तो हरि । राहे तेव्हा नुरी धर्मकर्मां ॥ ४६ ॥
वरील श्लोकाचा घेता तात्पर्यार्थ । ऐसाचि निश्चित तो ठरतो ॥ ४७ ॥
सुकर्में **कारण** पराभक्ति **कार्य** । साधन निर्वीय साध्यागमीं ॥ ४८ ॥

### श्लोक

**वेदे रामायणे चैव पुराणे भारते तथा ।**
**आदौ मध्ये तथा चांते हरिः सर्वत्र गीयते ॥** ( गजेंद्रमोक्ष )
**वेदैश्च सर्वैरहमेव वेद्यः** ( गीता १५. १५ )

**स्वाध्याय** ह्या कर्में सद्वस्तूचे ज्ञान । होतां मग मन नेच्छी कर्में ॥ ४९ ॥
वस्तुज्ञानावीण नुपजे तत्प्रीति । ही आहे प्रतीति सर्वत्रांना ॥ ५० ॥
सदसद्वस्तूच्या विवेकें अंतिम । साध्य तें " तद्ब्रह्म " ऐसें पटे ॥ ५१ ॥
ब्रह्म आणि ईश एकरूप होती । ऐशी दृढ मति दे **स्वाध्याय** ॥ ५२ ॥
तैं ब्रह्मीं वा ईशीं परम जे प्रेम । तें होतें सुगम श्रध्दान्वयें ॥ ५३ ॥
ईश्वराची शांति परम निर्वाण । कळलिया कोण सोडी तिला ॥ ५४ ॥

शांती ते जो इच्छी तया कर्मी काज । नाहीं हें सहज सिद्ध होतें ॥ ५५ ॥
साध्य साधनें तीं सांख्यां योग्यासम । त्या निष्ठा विषम कैशा होती ॥ ५६॥
सांख्यनिष्ठेचीं जीं साधने तीं चार । तयांचा विचार करूं आतां ॥ ५७ ॥
तत्त्वतः पाहतां ज्या सदसद्वस्तु । नित्यानित्य वस्तु त्याच होत ॥ ५८ ॥
**नित्यानित्यवस्तु विवेक प्रथम** । साधन दुर्गम **प्रापंचिकां** ॥ ५९ ॥
**ब्रह्म** मात्र **सत्य अनित्य** हें **जग** । ऐसाचि उमग व्हावा लागे ॥ ६० ॥
**स्वाध्याय** ह्या कर्में होय तो उगम । अनित्य हे मग त्याज्य होतें ॥ ६१ ॥
ऐशी त्यागबुद्धि जन्मोजन्मीं वाढे । तै उपजे गाढे **वैराग्य** ते ॥ ६२ ॥
**शमदमादिक स्वभावज कर्में** । वैराग्याच्या धर्में मग येती ॥ ६३ ॥
स्वभावज कर्मां न चले उपाय । **सर्वकर्मक्षय** तोचि **शम** ॥ ६४ ॥
**शमदमादिक षट्क** तें **तृतीय** । साधन **द्वितीय वैराग्यांतीं** ॥ ६५ ॥
वैराग्योद्भुत हे तृतीय साधन । तयाचें वर्णन करूं साग ॥ ६६ ॥
मनाचा निग्रह तोचि होय **शम** । दुसरा तो **दम** इंद्रियाचा ॥ ६७ ॥
सर्व **मात्रास्पर्श** साहणे शांतीनें । ह्या रूपे घे ठाणे ती **तितिक्षा** ॥ ६८ ॥
निद्रावस्थेमाजीं जगाची विस्मृति । तैशी मनःस्थिति जागरींची ॥ ६९ ॥
तीच **उपरति** जाणावी निश्चित । न करी दुश्चित्त कधीं जीवा ॥ ७० ॥
अंतःप्रसन्नता अखंडत्वे राहे । **समाधान** होय ते त्रिसत्य ॥ ७१ ॥
**ईश शास्त्र गुरु** ह्यांच्या ठायीं **निष्ठा** । अखंड वरिष्ठा तीच **श्रद्धा** ॥ ७२ ॥
तृतीय साधनीं उपांगे ऐशीं हीं । जीवासी विदेही करितात ॥ ७३ ॥
अनित्याचा त्याग येथें पूर्ण झाला । त्यापुढे उरला **आत्मलाभ** ॥ ७४ ॥
**मुमुक्षुता** चौथें साधन शेवटीं । उद्भवे ज्या पोटीं तो सच्छिष्य ॥ ७२ ॥
**जीवशिवांचें जें ऐक्य ते** लाभावे । जन्मे ऐशा भावे ती मुमुक्षा ॥ ७६ ॥
सर्व साधनांची होई सफलता । तेव्हां मुमुक्षुता होते तीव्र ॥ ७७ ॥
तीव्र मुमुक्षुते पूर्वील साधने । नावश्य हें जाणे एक गुरु ॥ ७८ ॥

जन्मोजन्मीं केल्या अखंड साधने । तीं फलरूपाने पुढें येती ॥ ७९ ॥
विशुद्ध सात्विक संपदा ये ऐशी । निसर्गें जयासी तोचि सिद्ध ॥ ८० ॥
जीवशिवैक्याचा होतो तो भुकेला । कर्मकोंडा त्याला अत्यनिष्ट ॥ ८१ ॥
साधकावस्थेचा साधनपसारा । तया नसे थारा सिध्दाठायीं ॥ ८२ ॥
सर्वोत्तम साध्य निश्चित ज्या होत । तत्साधनें प्राप्त झाल्यावरी ॥८३ ॥
तयालागीं साध्यावीण कोठे हाव । नसे सर्व वाव कर्मे त्यातें ॥ ८४ ॥
कर्मेंचि तयाला भिऊनि सोडिती । तयाची संगती नेच्छीत तीं ॥ ८५ ॥
स्वसाध्याच्या ठायीं वांच्छी एकात्मता । तदन्या तत्त्वता न पुसे तो ॥ ८६ ॥
ह्या कारणास्तव सांख्या ब्रह्माभ्यास । योग्यां ध्यानाभ्यास कार्य उरे ॥ ८७॥
ब्रह्माचे चिंतन अथवा ईशाचे । तयामाजी कैंचे कर्म शिरे ॥ ८८ ॥
सर्वभावे झाला दास ईश्वराचा । योगक्षेम त्याचा वाही हरि ॥ ८९ ॥
"जगन्मिथ्या" वाटे स्वानुभवे ज्याला । ईशाच्या जगाला तो न पुसे ॥९०॥
प्राप्त कर्म **घडे** इच्छी ना प्राप्ताते । मायेशीं तयाते नसे कार्य ॥ ९१ ॥
ऐसा **सिद्ध** तोचि हिरा अन्य काचा । महिमा तयाचा हरि जाणे ॥ ९२ ॥
हिरा दुर्लभत्वे हीन नोहे कदा । कुक्कुटाते सदा जरी त्याज्य ॥ ९३ ॥
तयाते परीक्षी ज्ञानी तत्त्वदर्शी । मग अर्पी त्यासी तत्साध्य जे ॥ ९४ ॥
बुध्दिग्राह्य आणि अतींद्रिय स्वात्मा । भोगी जो महात्मा तो सद्गुरु ॥ ९५ ॥
सिध्द तोचि असे भुकेला ज्ञानाचा । सद्गुरू तयाचा तृप्तिदाता ॥ ९६ ॥
सच्छिष्या साध्याची प्राप्ति झाल्यावरी । प्रपंचाची वारी सरे त्याची ॥ ९७ ॥
पुढे आत्मरतीमध्यें त्याचा काळ । जाई सारा वेळ आमरण ॥ ९८ ॥
अथवा ज्ञानार्थ श्रध्देने प्रार्थिला । तरी मुमुक्षुला दे तत्साध्य ॥ ९९ ॥
त्यासम आपणा प्रिय नसे कोणी । ऐसें चक्रपाणी वदे स्वये ॥ १०० ॥
आपल्या जगाचें भरणमार्थी ओझें । घालण्या न लाजे काय ईश ॥ १०१ ॥
ब्रह्मात्मैक्यभावें उपाधिशून्यता । पावोनी तत्त्वता ब्रह्मचि तो ॥ १०२ ॥

मिथ्या ऐशा जगीं सत्यत्वाचाभाव । तया कैसा देव देई पुन्हां ॥ १०३ ॥
सिद्ध जीवोत्तम मुक्त स्वये ब्रह्म । ऐसा असे क्रम साधनांचा ॥ १०४ ॥
परि शेणकिडा शेणामध्ये राजी । राहोनिया त्यजी साधनाते ॥ १०५ ॥
स्वात्म्याते जो नेणे त्यानें इतरांसी । न पाडावे फशी दांभिकत्वे ॥ १०६ ॥
सिद्ध तोचि साधु त्याचा स्वैराचार । देखिल्या साचार कळे धर्म ॥ १०७ ॥
वाचाळता व्यर्थ करी ना तो कधीं । क्रिया झाली आधीं मग बोले ॥१०८॥
" आधीं केले मग सांगितले" जनां । मार्ग हा साधेना असाधूते ॥ १०९॥
"सत्य असत्यासी मन केलें ग्वाही" । नाहीं, त्याते काहीं ज्ञान नसे ॥११०॥
देखियले डोळा ऐकियले कानीं । तेणे आत्मज्ञानी कोण झाला ॥ १११ ॥
वेदान्त तो नव्हे बाळकाच्या गोष्टी । साधनाने कष्टी व्हावे लागे ॥ ११२ ॥
साधनविहीन दाभिक पसारा । तेथ राहे थारा पूर्णा ज्ञाना ॥ ११३ ॥
ऐशिया दांभिका सत्यासत्य ज्ञान । नोहे परी जन वेडे असे ॥ ११४ ॥
शब्दपाडित्याने भुलूनीया जाती । ऐशीच फजीती सर्वत्राची ॥ ११५ ॥
लोकैषणा मनीं निस्वार्थता बाह्य । ऐशियाने काय लोकां लाभ ॥ ११६ ॥
बोलाचीच कढी बोलाचाची भात । तयानेंचि तृप्त होती मूढ ॥ ११७ ॥
साधनहीनत्वें प्रपंचींच स्वार्थ । मानिती त्यां व्यर्थ सर्वाध्यात्म ॥ ११८॥
ऐशिया नरानीं अध्यात्मीं किमर्थ । बरळावे व्यर्थ घमेडीने ॥ ११९ ॥
अध्रुव ते नष्ट आणि ध्रुव त्यागी । ऐसाचि अभागी प्रायःलोक ॥ १२० ॥
आधीं प्रपंचाची इच्छा पूर्ण जिरे । तैचि मन फिरे तेथोनिया ॥ १२१ ॥
जोंवरीं वैराग्य नुपजे मानसीं । निष्कामता कैसी राही तेथे ॥ १२२ ॥
अहंममतेने प्रापंचिक कर्म । केलिया विकर्म ेंचि होय ॥ १२३ ॥
मायामय जग ईश त्याचा कर्ता । त्याचें ओझे माथा जीव घेई १२४ ॥
ऐशा ममत्वानें घडे जें जें कर्म । तें सारें विकर्म होत असे ॥ १२५ ॥
कर्मफलत्याग फलप्राप्ती पुढें । केलिया तो घडे यथार्थचि ॥ १२६ ॥

यज्ञार्थात्कर्मणोऽन्यत्र लोकोऽयं कर्मबंधनः ॥ गीता ३० ॥

यज्ञः कर्म समुद्भवः ॥ गीता ३. १४ ॥

भोक्तारं यज्ञतपसा मा ॥ गीता ५. २९ ॥

अहं क्रतुरहंयज्ञः ॥ गीता ९. १६ ॥

ईश्वरार्थ कर्म त्याविना कोठेहि । निष्कामता नाहीं जगामध्ये ॥ १२७ ॥
अन्यार्थ जे कर्म असे, ते न घेई । कदा शेषशायी अर्पितां त्या ॥ १२८॥
फलासह कर्म अर्पावे ईशासी । तेणेच तयासी होय तुष्टि ॥ १२९ ॥
ऐशिया भक्ताचा योगक्षेम हरि । वाहे निज शिरीं म्हणे तोचि ॥१३० ॥
ईश्वर अदृष्ट तत्प्राप्त्यर्थकर्मे । न देती स्वधर्मे दृष्ट फले ॥ १३१ ॥
ज्या यज्ञांचीं फले नव्हतींच दृष्ट । तेचि यज्ञ इष्ट कर्मयोगीं १३२ ॥
यज्ञभोक्ता हरि तो असे अदृश्य । कैशीं फलें दृश्य देईल तो ॥ १३३ ॥
**वैदिक यज्ञांचीं** फलेहि अदृष्ट । ईशा तेच इष्ट म्हणे हरि ॥ १३४ ॥
एतदर्थ सांख्य आणि योगमार्ग । फलेत्यागे सांग ऐक्या येती ॥ १३५ ॥
साध्यदृष्टयाहि ते येती ऐक्यभावा । ज्ञान लाभ ठेवा दोघा सम ॥ १३६ ॥
ईश प्रणिधान घडे भक्तियोगे । ईशकृपायोगें ज्ञानप्राप्ति ॥ १३७ ॥
मायिक कर्मानीं साधेनाचि स्वार्थ । आयुष्याचा व्यर्थ क्षय होतो ॥ १३८ ॥
प्रपचीं अखिल जीवाची प्रवृत्ति । अध्यात्माची प्राप्ति नरदेहीं ॥ १३९ ॥
ऐसा नरदेह दवडिता वाया । काय देवराया जाब द्यावा ॥ १४० ॥
आपुला आपण शत्रु किंवा मित्र । वाणी ही पवित्र वदे कृष्ण ॥ १४१ ॥
मत्स्य-पक्षादिकां सामर्थ्य सहज । नरे त्याचे चोज कां करावें ॥ १४२ ॥
तयाचे सामर्थ्य मेळवाया श्रम । नीच योनीधर्म तोचि होय ॥ १४३ ॥
ऐशा भ्रमे होते उच्चयोनिहानि । पुढे नीच योनि येई स्वेच्छे ॥ १४४ ॥
ईशप्राप्ति झाल्या त्याच्या शक्ति येती । त्याच्या भक्ताप्रति काय उणे ॥१४५॥
देहांतीं भावना तत्सदृशजन्म । ऐसा असे क्रम जीवजन्मीं ॥ १४६ ॥

ह्या कारणे त्याज्य योगसिध्दि होत । ऐसेचि वदत योगशास्त्र ॥ १४७ ॥
भौतिक पूर्णतेपुढे आत्मलाभ । घ्यावा ऐसा भाव जगदीशीं ॥ १४८ ॥
ऐशा आद्यभावे नरदेहोत्पत्ति । करी जगत्पति कृपालुत्वे ॥ १४९ ॥
परि तो उद्देश नुमजोनी जन । आपुले पतन साधिताती ॥ १५० ॥
हेंचि माया कार्य ओळखूनि जीवे । शरण त्या जावे जगदीशा ॥ १५१ ॥
मायानाश नोहे ईशकृपेवीण । म्हणून शरण त्याला जावे ॥ १५२ ॥
शुध्द भक्ति आद्य करी जेव्हां जीव । आवरितो देव तेव्हां माया ॥ १५३ ॥
मायेच्या नाशार्ती लाभे आत्मज्ञान । जीवेशैक्य पूर्ण तेणे होय ॥ १५४ ॥
"**ज्ञान**" ह्या शब्दाचा अर्थहि कळेना । ऐशी आली दैना सार्वत्रिक ॥१५५॥
गीता वाचूनिया उपयोग काय । शब्दज्ञान होय जरी खोटे ॥ १५६ ॥
उच्च शिक्षणाची ऐशी तारांबळ । व्हावयाचा काळ माजलासे ॥ १५७ ॥
गाढाज्ञान जनीं देखवेना डोळां । येतो कळवळा पोटामाजीं ॥ १५८ ॥
जने सावधान व्हावें ह्याचसाठीं । आम्हा ही आटाटी लावी साई ॥१५९॥
ही वाक्पुष्पमाळा अर्पुनी साईसी । नीलकंठ त्यासी वंदीतसे ॥ १६० ॥

—इतिपूर्वार्धः—

## अथ उत्तरार्धः

(—योगांग विचार—अनुष्टुप् छद—)

जी सर्वोपनिषद्वाणी । ईश्वराचीच होय ती ।
ह्याला प्रमाण गीतोक्ति । **ब्रह्माक्षर समुद्भवम्** ॥ १ ॥
**ब्रह्म** हे नाव **मायेचे**। ऐसे जे प्रतिपादन ।
त्याची अपूर्वता कोणा । वर्णवेना यथार्थ ती ॥ २ ॥
**महद्ब्रह्म** म्हणे **ब्रह्म** । तत्पांडित्य अपूर्व ते ।
ईश्वराची असे योनी । महद्ब्रह्मचि हे खरें ॥ ३ ॥
ईश्वराची जी असे योनी । ईश्वराहूनि अल्प ती ।
इतुकें नुमजे ज्याला । मूर्ख—पंडित तोचि कीं ॥ ४

अवयवी असे पूर्ण । नावयव तसे कदा ।
इतुके नुमजे ज्याला । महा मूर्ख कसा न तो ॥ ५ ॥
शक्त आणीक तच्छक्ति । न होतीं एक तीं कदा ।
इतुके नुमजे ज्याला । बालबुध्दि खराचि तो ॥ ६ ॥
माझा हस्त असे मीच । ऐसे जो प्रतिपादितो ।
तो नर न म्हणावा कीं । वानरचि स्वयें असे ॥ ७ ॥
असो पूर्वानुसंधाना । चालवावे पुढे बरे ।
हाचि इष्टार्थ आम्हासी । वाटे आता इतःपर ॥ ८ ॥
ब्रह्मनिष्ठा नव्हे अन्य । ब्रह्मविद्येहुनी कदा ।
भेद आहे तयामध्ये । "नाम तो न च वस्तुतः" ॥ ९ ॥
द्विविधा ती असे एक । "सांख्य-योग" स्वरूपिणी ।
निर्गुणीं जाय ज्ञानाने । सगुणेशींच योग ने ॥ १० ॥
सगुणानिर्गुणांमाजीं । भेदे काहीं असेचिना ।
भेदभास असे जो तो । "नाम तो न च वस्तुतः" ॥ ११ ॥
सर्वोपनिषदीं आहे । ब्रह्मविद्या निरूपित ।
तिचेचि सार श्रीकृष्णे । गीतेत कथिले असे ॥ १२॥
दर्शनें सांख्ययोगाचीं । त्याचेहि मूळ वेदचि ।
"सर्वोपनिषदोत्रो । दुग्धं गीतामृतं महत् ॥" १३ ॥
ब्रह्मविद्येत जे आहे । योगशास्त्र तयांतलीं ।
कृष्णार्जुनांचिया बोलीं । प्रमेये होत तीं कथूं ॥ १४ ॥
शास्त्राधारे यथार्थत्वे । योगाचे सांग वर्णन ॥
करूं जेणे समाधान । पावतीलचि सत ते ॥ १५ ॥
योगांगें असती आठ । यम् (यम) नियम आसन ।
प्राणायाम असे चौथे । प्रत्याहारचि पाचवे १६ ॥

सहावे **धारणा** होय । **ध्यान** ते सातवे असे ।
**समाधि** हे अष्टमाचे । नाम अष्टाङ्ग योग हा ॥ १७ ॥
श्रीकृष्णाने **स्वगीतेत** । योग हा वर्णिला असे ॥
**कर्मयोग** असे हाचि । कर्मावीण असाध्य जो ॥ १८ ॥
**समत्वीं** बुद्धि थाराया । उत्तमोपाय हाचि कीं
षष्ठाध्यायीं अशा अर्थें । अर्जुना उपदेशिला ॥ १९ ॥
साधने योग-निष्ठेचीं । शास्त्र सांगे यथाक्रमें ॥
पूर्व पूर्वीलियांपेक्षा । उत्तरोत्तर श्रेष्ठ जीं ॥ २० ॥
**यमाचे भेद ते पांच** । त्यांचीं नावे पहा अशीं ॥
**अहिंसा सत्य अस्तेय । ब्रह्मचर्यापरिग्रह ॥ २१ ॥**
काया वाचा मनें त्यागी । जीवद्रोहासि वृत्ति जी ॥
**अहिंसा** तीच सत्यत्वे । ज्ञान चिन्हात जो वसे ॥ २२ ॥
मनीं वसत जे जैसे । तैसे सारेचि बाह्यतः ॥
व्यक्त होणे तया नाम । **सत्य** भाषण शोभते ॥ २३ ॥
स्वसत्ता नच ज्या ठायीं । ऐसे जे त्याज्य सर्व ते ॥
मानणे ह्यासि **अस्तेय** । नाम होय यथार्थचि ॥ २४ ॥
काया वाचा मने नित्य । परस्त्रीतें उमा रमा ॥
मानणे ते **ब्रह्मचर्य** । न स्त्रीसंग अशास्त्र जो ॥ २५ ॥
पतीचा देह भोगार्थ । तदितर शिवासम ॥
**ह्मचर्य** असे होय । नारींचे सर्व निश्चित ॥ २६ ॥
देहद्वयाचिया अर्थी । होय जे उपकारक ॥
अस्वीकार तयांचा जो । **अपरिग्रह** तोचि कीं ॥ २७ ॥
ह्या पंचमाचिया पोटीं । पूर्वील **यम** राहती ॥
त्या सर्वांचे करी काम । एकला **अपरिग्रह** ॥ २८ ॥
योगाचे **यम** हे अंग । पहिलेंच तयामध्ें ॥
**संन्यासाची** पुरी वस्ती । **सांख्ययोगैक्य** तें असे ॥ २९ ॥

पंचरूपे यमाचीं हीं । आता **नियम** कोणते ॥
पतंजल्यादिकीं शास्त्रीं । कथिले ते वदूं पुढे ॥ ३० ॥
नियमांचीं हि जीं नामे । शास्त्रे कथिति तीं अशीं ॥
**शौच संतोष** हीं दोन । **तप** हे तिसरे असे ॥ ३१ ॥
**स्वाध्याय** हे चतुर्थाचे । **ईश्वरप्रणिधान** हें ॥
पंचमा नियमा नाम । ह्यांचीं रूपे कथूं पुढे ॥ ३२ ॥
बाह्याभ्यंतर देहाचे । चित्ताचे ते दुजे असे ॥
**शौच** ऐसें द्विप्रकार । आगमीं वर्णिलें असे ॥ ३३ ॥
पंचगव्यादिकें होते । अंतःशुद्ध शरीर ते ॥
बाह्यशुद्धि शरीराची । होतसे मृज्जलादिकीं ॥ ३४ ॥
कामादिक विकाराच्या । त्यागाने **शौच** लाभते ॥
**चित्तशुद्धि** तया नाम । धीमान् वदति तत्त्वतः ॥ ३५ ॥
वासनानुद्भवासीच । **संतोष** म्हणती खरा ।
स्मृत्युक्तीच असे ऐशी । **"ऐकाग्र्यं परमं तपः"** ॥ ३६ ॥
अभ्यासा मोक्षशास्त्राच्या । महामंत्र जपासिवा ॥
**स्वाध्याय** वदती वेद । चतुर्थ नियमासि ह्या ॥ ३७ ॥
सारीं सुकर्में सर्वस्वीं । जगदीशा समर्पिणें ॥
अहंममत्व राहित्ये । **ईश्वरप्रणिधान** ते ॥ ३८ ॥
ईश्वरप्रणिधानाचा । अंतीं नियम ह्यास्तव ॥
कीं तत्पूर्वील चारीही । समावति तयामधें ॥ ३९ ॥
ह्या पाची नियमांमध्ये । कर्म स्वाध्याय येतसे ॥
नित्यानित्य विवेकार्थी । सांख्यांनाहि अवश्य जे ॥ ४० ॥
**आधिभौतिक आरंभा** । सांख्यीं योगीं नसे स्थल ॥
**ब्रह्मनिष्ठा** असे नाव । ह्यामुळे शोभते तिला ॥ ४१ ॥
सांख्ययोगैक्य ह्या रीती । प्रस्थापित पुनः असे ॥
" एकं सांख्यं च योगंच । यःपश्यति स पश्यति " ॥ ४२ ॥

कर्मयोगीं दशोपांगे । आद्य ऐशी अवश्यक ॥
निःसंशयेंचि तीं सारी । संन्यासपर तत्त्वतः ॥ ४३ ॥
ह्या पुढील षडंगे जीं । तीं सारीं गुरुगम्यचि ॥
गुरुवीण न तीं साध्य । आगमीं बोध हा असे ॥ ४४ ॥
परि आद्य जयाने दों । साध्य केलीं अशा नरा ॥
येतो गुरूचि शोधाया । कीं त्या सच्छिष्य दुर्लभ ॥ ४५ ॥
मुक्तांचे हे अतिश्रेष्ठ। असे काय जगामध्ये ॥
आधिभौतिक दुष्कर्में । ग्रासियेलें जया जगा ॥ ४६ ॥
ऐशी अवनती झाल्या । बहुकालचि लोटला ॥
त्याच्यायोगे गुरुप्राप्ति । होण्याचाही असंभव ॥ ४७ ॥
आद्य दों साधनानाहि । नसे ठाव जगामधे ॥
तेणें योगीश्वरानींहि । त्यागियेले असे जग ॥ ४८ ॥
साग्र गीतार्थ बोधाचा । जगीं मार्ग दिसेचिना ॥
नाहीं सांख्य न तो योग । हीनता हीच सांप्रत ॥ ४९ ॥
सत्क्रिया विलया गेल्या । वाक्पांडित्यचि माजले ॥
ब्रह्मनिष्ठा लया गेली । कलीचा महिमा असा ॥ ५० ॥
असो गीतेमधे आहे । जें उल्लेखित **आसन** ।
अनेकत्वे असे तेंहि । वर्णिले बहु आगमीं ॥ ५१ ॥
**प्राणायाम** नसे सोपा । गुरुगम्यचि तो असे ॥
गुरूवीण न तो साध्य । साधकाला कदापिही ॥ ५२ ॥
**प्राणायामे मनोनाश । वासनात्याग** रूप जो ॥
तो साधतो यथाकालें । ऐसें शास्त्रचि सांगते ॥ ५३ ॥
विवेके वासनात्याग । प्राणायामे मनोजय ॥
**द्विविधा ब्रह्मनिष्ठेचे** । येथेंहि **ऐक्य** होतसे ॥ ५४ ॥
**विषयेंद्रियसंयोगा** । मनाने त्यागिल्याविना ॥
**एकनिष्ठा** नसे प्राप्त । **प्रत्याहार**चि होय जी ॥ ५५ ॥

**प्रत्याहारा** तया नाम। तिजे **संयम** हें असे ॥
भृंगकीटकन्यायानें। सिद्धीदायक होय जो ॥ ५६ ॥
मनाची **समता** साध्य। प्रत्याहारेंचि होतसे ॥
अभ्यास आणि वैराग्य। ह्यांविना तीहि दुर्लभ ॥ ५७ ॥
प्रत्याहाराचिया दार्ढ्या। नाम ते **धारणा** असे ॥
धारणेचें अखंडत्व। तयासी **ध्यान** बोलती ॥ ५८ ॥
ध्येय ध्याता तसे ध्यान। त्रिपुटी ही निमालिया ॥
ध्येयरूपे मुमुक्षूची। स्थिति तीच **समाधि** कीं ॥ ५९ ॥
ध्येयें होती जशीं भिन्न। तत्सिद्धिहि समान त्या ॥
प्राप्ति अलभ्य वस्तूंची। संयमे होत साधकां ॥ ६० ॥
योगशास्त्रीं अशा सिद्धि। लौकिकी कथिल्या, तयां ॥
सर्वांचा त्याग आरंभी,। ईश्वरीं एकनिष्ठ जो ॥ ६१ ॥
ऐसा सिद्धांत श्रीकृष्णे। कथिला तो असा असे ॥
"व्यवसायात्मिका बुद्धिरेकेह कुरुनंदन" ॥ ६२ ॥
"**मनः**संयम्य मच्चित्तो। युक्त आसीत मत्परः"॥
**संयमें** प्राप्ति ईशाची। होते कृष्ण स्वये वदे ॥ ६३ ॥
"समत्वायोग ही संज्ञा"। ह्या मधील समत्व जे ॥
**संयमावीण** तें प्राप्त। होणे शक्य नसे कदा ॥ ६४ ॥
संयमें भक्त ईशाचा। अथवा ईशरूप जो ॥
ऐशियां योगनिष्ठांना। दुष्कर्मेंहि न बाधती ॥ ६५ ॥
ऐसा स्पष्टचि सिद्धांत। गीतेमाजीं वदे हरि ॥
तोचि दावूं पुढे आतां। वाचकां बोध व्हावया ॥ ६६ ॥
" यस्य नाहंकृतो भावो। बुद्धिर्यस्य न लिप्यते ॥
हत्वापि स इमाँल्लोकान्न हंति न निबध्यते " ॥ ६७ ॥
अशा भक्तांसि वा मुक्तां। कार्याकार्य नसे मुळीं ॥
अहंममत्वत्यागी जो। कर्मापासूनि मुक्त तो ॥ ६८ ॥

**स्थितप्रज्ञा गुणातीता । सद्भक्तां** तेवि हे कळे ॥
पामराच्या दुरुक्ती त्या । त्याज्य विष्टेसमानचि ॥ ६९ ॥
असो प्राक्साधनांवीण । साध्य नोहेच्चि **संयम** ॥
**संन्यासपर** तीं सारीं । **सांख्ययोगैक्य** ते असे ॥ ७० ॥
**यम नियम** ह्या दोन्ही । आद्य अंगाविणें नसे ॥
योग कोणासहि साध्य । ऐसे वदति आगम ॥ ७१ ॥
आणि हीं आद्य योगांगें । असाध्य अविरागतः ॥
जसे सांख्या तसे योग्या । वैराग्यचि अवश्य तें ॥ ७२ ॥
ज्ञाने वैराग्य ज्या लाभे । तयाना सांख्य मार्ग तो ।
योग्य होतो अशा भावे । ते संन्यासा प्रवर्तती ॥ ७३ ॥
शमदमादि ज्यां लाभे । सहजत्वेचि संपदा ॥
ऐशाचि भाग्यवानांना । संन्यासा अधिकार तो ॥ ७४ ॥
ज्ञाने वैराग्य ज्या नोहे, । तयांना योगमार्गचि ।
योग्य होय, अशा भावे । संन्यासासी अयोग्य ते ॥ ७५ ॥
प्रारब्धेचि गती ऐशी । द्विविधा अनिवार्यतः ॥
होते, ऐसे वदे गीता । " यो यच्छ्रद्धः स एव सः " ॥ ७६ ॥
सांख्यांच्या साधनांनीं वा । योगांगांनीं न सिद्ध जो ॥
तोंवरी निजधर्माचीं । कर्मे होती अवश्यक ॥ ७७ ॥
योगाने होत **संसिद्धी** । ती होते ज्ञानदायक ॥
अहंभावाचिया नाशें । ईश्वरत्वासि पाववी ॥ ७८ ॥
**संन्यास** दे **परासिद्धि** । जी साक्षाद् ब्रह्मरूपिणी ॥
ईश्वराचेचि जे आद्य । रूप तें होय ती स्वयें ॥ ७९ ॥
द्विविधा ब्रह्मनिष्ठा जी । " सांख्ययोगौ" स्वरूपिणी ॥
ऐशापरी नसे भिन्न । साधनांच्याहि दृष्टिनें ॥ ८० ॥
ब्रह्मात्मबोध तो ब्रह्मीं । आणि ईशीं असे सम ॥
साध्यदृष्ट्याहि ती निष्ठा । होय ऐशी अभिन्नचि ॥ ८१ ॥